सत्यमेव जयते

**राज्य आरोग्य माहिती व जीवनाविषयक आकडेवारी कार्यालय**

**महाराष्ट्र शासन — सार्वजनिक आरोग्य विभाग**

डॉ. नायडू सांसर्गिक रुग्णालय आवार, केनडी रोड पुणे — ४११००१

सार्वजनिक आरोग्य विभाग
महाराष्ट्र शासन

| | |
|---|---|
| **उपसंचालक आरोग्य सेवा (आ मा जी आ)**<br>**तथा उपमुख्य निबंधक जन्म मृत्यू**<br>**महाराष्ट्र राज्य पुणे -०१** | संकेतस्थळ : arogya.maharashtra.gov.in<br>कार्यालय : ०२० - २६०५९५३०<br>नानोप विभाग : ०२० — २६०५८२९२<br>विवाह नोंदणी : ०२० — २६०५८६१०<br>ई -मेल : mahvivah@gmail.com |
| **आरोग्य सेवा**<br>ना.नों.प. | जा.क्र आमाजीआ/कक्ष- ८१/ ना.नों.प./ ज -मृ ऑ. नोंदणी Advisory/ 13919-58 /२०२५<br>दिनांक : ४/११ /२०२५ |


प्रति

जिल्हा आरोग्य अधिकारी

तथा जिल्हा निबंधक, जन्म व मृत्यू

जिल्हा परिषद.......... (सर्व)

विषय: पोर्टल / वेबसाइटद्वारे जन्म आणि मृत्यूची ऑनलाइन नोंदणी करण्याबाबत.

संदर्भ: १) भारताचे महानिबंधक यांच्या कार्यालयाचे पत्र क्र. F.No. १/१२/२०२४-VS-(CRS)/२१३७ दि. १३/१०/२०२५

२) या कार्यालयाचे पत्र क्र.आमाजीआ / ना.नों.प/कक्ष ८१/ ज.मृ.नोंदणी दक्षता/५५४२-५६०७/२५ दि. २२/०५/२०२५

उपरोक्त विषयान्वये संदर्भीय पत्र १ नुसार पोर्टल / वेबसाइटद्वारे जन्म आणि मृत्यूची ऑनलाइन नोंदणी करताना घ्यावयाच्या दक्षतेबाबत मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत.तसेच जन्म आणि मृत्यू घटनांची CRS Portal या संगणक प्रणालीवर online नोंदणी याबाबत आपणास घ्यावयाची दक्षता यांचेसाठी मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत.

त्यानुसार पोर्टल / वेबसाइटद्वारे जन्म आणि मृत्यूची ऑनलाइन नोंदणी करताना खालील सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत आपले अधिनस्थ सर्व निबंधक यांना पत्राद्वारे त्वरित अवगत करावे.

१) जन्म मृत्यू नोंदणी करताना निबंधकांनी त्यांचा युजर आयडी आणि पासवर्ड इतर कोणत्याही व्यक्तीसोबत शेअर करू नये. जन्म आणि मृत्यूच्या ऑनलाइन नोंदणीसाठी वापरलेला त्यांचा पासवर्ड नियमित बदलण्यात यावा. अशी माहिती शेअर केल्याने पोर्टल/वेबसाइट वापरून अनधिकृत व्यक्तींकडून बनावट जन्म आणि मृत्यु प्रमाणपत्रे जारी केली जाऊ शकतात.

२) उपरोक्त सूचना देवूनही लॉगिन क्रेडेन्शियल्स शेअर करणे अजूनही प्रचलित आहे. देशात काही ठिकाणी जिल्हा निबंधक/निबंधक यांच्या पातळीवर लॉगिन आयडी पासवर्ड आणि ओटीपी शेअर केल्यामुळे बनावट प्रमाणपत्रे जारी केल्याची प्रकरणे काही राज्यांत नोंदवली गेली आहेत. यामुळे काही प्रकरणांमध्ये संबंधित राज्य सरकारने फौजदारी खटले दाखल केले आहेत.

३) निबंधक यांनी त्यांचे login ID व Password इतर कोणासही share करू नयेत. जिल्हा निबंधक व वरिष्ठ स्तरावर अशाप्रकारे login ID व Password शेअर केले तर गंभीर परिणाम होऊ शकतात.

४) बरेच फेक पोर्टल व वेबसाईट या अधिकृत वेबसाईट सारख्या दिसतात म्हणजेच अनधिकृत व्यक्तींकडून फिशिंग वेबसाईट तयार केलेल्या आहेत त्यांच्या मार्फत अत्यंत संवेदनशील माहिती उदा. पासवर्ड, क्रेडीट कार्ड नंबर इ. उघड होवू शकते. URL चा address हा की बोर्ड चा वापर करून टाकण्यात यावा. Search Engine चा वापर करू नये.

५) सदर नोंदणी प्रक्रियेमध्ये कुठलीही फसवी activity किंवा सुरक्षेला धोका होईल अशी activity निदर्शनास आलेस त्वरित त्याची दखल घेऊन योग्य ती चौकशी करावी व दोषी आढळलेस त्वरित उचित कार्यवाही करावी. कायद्याचे उल्लंघन झालेस FIR दाखल करावी.

६) सध्या वापरात असलेले CRS पोर्टल यांचा पासवर्ड व Username & OTP कोणीही इतरांना share करू नये. Active Users किती आहेत याबाबत माहिती Update करावी. याबाबत आपल्या कार्यक्षेत्रात प्रत्येक निबंधकांना माहिती द्यावी. तसेच जिल्हास्तरीय समन्वय समिती मध्ये याबाबत चा agenda नियमित ठेवावा.

या सर्व मार्गदर्शक सूचना जिल्हा निबंधक यांनी त्वरित आपल्या कार्यक्षेत्रात देण्यात याव्यात.

डॉ.बी.एस.कमलापूरकर
उपसंचालक, आरोग्य सेवा (आ.मा.जी.आ.)
तथा उपमुख्य निबंधक, जन्म व मृत्यू
पुणे.

प्रत माहितीस्तव सविनय सादर:

१) मा. सचिव १, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई.
२) मा. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई.
३) मा. संचालक, जनगणना कार्यालय, मुंबई.
४) मा. संचालक, आरोग्य सेवा आयुक्तालय मुंबई.
५) मा. संचालक, आरोग्य सेवा तथा मुख्य निबंधक, जन्म व मृत्यू, पुणे